# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.02.2025** **वार : रविवार**

---

**ठळक बातम्या,**

1. भारत देश विकासाच्या अमर्याद संधी असलेला देश आहे. या संधी ओळखून आपल्या आणि देशाच्या प्रगतीत योगदान द्यावं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं युवकांना आवाहन.

2. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून 2047 पर्यंत विकसित भारत निर्मितीच्या कार्याचा मजबूत पाया घातला असल्याचं केंद्रीय मंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन

3. सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू होणार.

4. दिल्लीमध्ये सुरु असलेल्या 98 व्या मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप

आणि

5. सिंधुदुर्ग जिल्हयातील तारकर्ली इथल्या समुद्रात पुण्यातील दोन युवकांचा बुडून मृत्यू

**उपराष्ट्रपती छ.संभाजीनगर दौरा**

“ वेगाने विकास होत असलेला आपला भारत देश विकासाच्या अमर्याद संधी असलेला देश आहे. या संधी युवक युवतींनी ओळखून आपल्या आणि देशाच्या प्रगतीत योगदान द्यावं ”, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 65 व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपराष्ट्रपती बोलत होते. धनखड यांच्या सुविद्य पत्नी डॉ सुदेश धनखड, विद्यापीठाचे कुलपती राज्यपाल सी पी राधाकृष्णन, कुलगुरू डॉ विजय फुलारी, खासदार डॉ भागवत कराड यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. माजी विद्यार्थी हे शिक्षण संस्थेची

खरी शक्ती असतात आणि त्यांच्याकडून संस्थेला सर्वप्रकारे मिळणारं योगदान हे संस्थेच्या प्रगतीत भर घालत असल्याचं, उपराष्ट्रपतींनी नमूद केलं. दरम्यान, आपल्या या दौऱ्यात उपराष्ट्रपतींनी वेरुळ इथं घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचं दर्शन घेऊन जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरुळ लेणी समूहाला भेट दिली.

**अमित शाह पुणे पश्चिम विभाग बैठक**

केंद्रीय गृह विभागाच्या पश्चिम विभागीय परिषदेची 27 वी बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल पुण्यात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल तसंच दादरा नगर हवेली आणि दिव दमण या केंद्रशासित प्रदेशातील प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये पश्चिम विभागाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं सांगत या विभागाचा व्यापार भारताच्या एकूण व्यापाराच्या निम्म्यापेक्षाही जास्त असल्याचं त्यांनी नमूद केलं. या बैठकीत एकूण 18 मुद्दे चर्चेला घेण्यात आले.

**आवास योजना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 2047 पर्यंत विकसित भारत बनिवण्याचे स्वप्न आहे.  पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून विकसित भारताच्या निर्मितीचा मजबूत पाया घातला आहे.  असे प्रतिपादन केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी पुण्यात केले. केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत काल प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या दहा लाख लाभार्थ्यांना, या योजनेच्या पहिल्या हप्त्याचं वितरण तसंच वीस लाख लाभार्थ्यांना मंजुरीपत्रांचं वितरण करण्यात आलं. पंतप्रधान आवास योजना' कोट्यवधी गरिबांचं स्वतःचं घर असावं हे स्वप्न साकार करत  असल्याचं शाह यांनी सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले,

**जिनके  पास भूमी नही  उनको ओर  1 लाख देने  का काम भी आज यहा पर हुवा हे  ओर मे आप सभी को अग्रिम शुभ कामनाये देना चाहता हूं के आगली  दीपावली आप सभी आपने  घर मे मनाए ऐ सी  मेरी अपाको शुभ कामनाए**

पुण्यातील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी इथं झालेल्या या कार्यक्रमाला  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या

हस्ते महाआवास अभियान 2024-25 पुस्तिकेचे प्रकाशन आणि पोस्टरचे अनावरण झालं. महाराष्ट्राला पंतप्रधान आवास योजनेची पहिल्या टप्प्यात 13 लाख 57 हजार घरे आणि दुस-या टप्प्यात पहिल्याच वर्षी 20 लाख घरे मिळाली आहेत. तसंच राज्य सरकारच्या रमाई आवास योजना, मोदी आवास योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून 51 लाख कुटुंबाला घरे देण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली चालू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं. ते पुढे म्हणाले,

**घर हे जस त्या पुरुषाच्या नावावर आहे तस आमची जी भगिनी आहे तिचे देखील नाव त्या घरामध्ये असलच पाहिजे हे देखील आपण ठरवलेले आहे , त्यामुळे सगळ्या भावांना विनंती की आमच्या ज्या भगिनी आहेत जय वाहिनी आहेत त्यांच नाव त्या घरामध्ये असल पाहिजे याची काळजी आपण घ्यायची आहे, जस मोफत घर हव तस मोफत वीज देखील मिळायला हवी आणि म्हणून 20 लाख लाभार्थ्यांना आम्ही सोलर चे अनुदान देणार आहोत . आणि सोलर तिथे फिट करून मोफत वीज तुम्हाला जन्मभारसाठी मिळणार आहे. कारण मोदीं च्या ठायी समाजातला गरीब , शेतकरी , मजूर, बारा बलुतेदार हा त्यांच्या पहिल्या रांगेत बसतो आणि म्हणून मोदी जी म्हणाले हा जो शेवटचा माणूस आहे , त्याची पहिली चिंता करा , त्याला घर द्या त्याला शौचालय द्या , त्याला वीज द्या म्हणून हा कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे.**

**जनता सहकारी अमृत महोत्सव**

सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणातून पाच लाख कोटी अर्थव्यवस्थेचं भारताचं लक्ष्य साध्य होईल असा विश्वास केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. पुण्यातील जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात ते काल पुण्यात बोलत होते.सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू करण्यात येणार आहे, तसंच देशभरातील सहकारी बँकांना सहकार्य करुन आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आल्याचं शाह यांनी यावेळी सांगितलं.

**साहित्य संमेलन**

दिल्लीमध्ये सुरु असलेल्या 98 व्या मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी काल विविध कार्यक्रमांनी साहित्य नगरी गजबजून गेली. **त्याचा हा वृत्तांत**...

..

या संमेलनाचा आज समारोप होत आहे.

**शिक्षण परिषद**

मुलांमधल्या मूळ, आपसूक गुणांना न्याय देऊन त्याद्वारे त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित करणं हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचं अत्यंत महत्त्वाचं उद्दिष्ट असल्याचं राज्य शालेय शिक्षण मंत्री डॉक्टर पंकज भोयर यांनी सांगितलं. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि विद्या भारती यांच्याद्वारे आयोजित पुणे शिक्षण परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील राज्य अभ्यासक्रम आराखड्याची सर्वांगीण चर्चा करण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरण हे भारतीय संस्कृतीचा गौरव करणारे आहे, त्यामुळे आता पुन्हा नव्याने या परंपरा शोधण्याची वेळ आली असल्याचं मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांनी केलं. परिषदेचा समारोप प्रभुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. परिवर्तन शिक्षणाचे, जागरण भारतीयत्वाचे, या उद्देशानं झालेल्या या परिषदेत, विविध आठ विषयांवरील चर्चासत्रात, 118 संस्थांच्या 463 प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

**सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्हयातील तारकर्ली इथं पर्यटनासाठी गेलेल्या पुण्यातील दोन युवकांचा काल सकाळी समुद्रात बुडून मृत्यू झाला. शुभम सुशील सोनवणे आणि रोहित बाळासाहेब कोळी अशी मृतांची नावे आहेत. ओंकार रामचंद्र भोसले हा युवक गंभीर असून त्याच्यावर मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तारकर्ली समुद्रात काल सकाळी, पुण्यातील हडपसर इथं राहणारे पाच युवक पोहण्यासाठी उतरले होते. त्यातले तीन युवक पाण्यात बुडल्याची दुर्घटना घडली.

**क्रिकेट**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तानच्या संघाशी होणार आहे. स्पर्धेत यापूर्वी भारतानं बांगलादेश विरुद्धच्या सामन्यात विजय मिळवला आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे,तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमानाची नोंद काल जळगाव इथं 12 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतकी होती. आज दिवसभरात कोकण आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं नमस्कार.**